## संक्षिप्त

### सांगलीकरांच्या मदतीतून आपदग्रस्तांना दिलासा

**सांगली :** सांगलीकरांनी दिलेल्या मदतीतून केरळ आपदग्रस्तांना दिलासा मिळाला आहे, असे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी येथे केले. सांगली जिल्हा प्रशासनाने उत्स्फूर्तपणे राबवलेल्या मदत मोहिमेतून महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत आणखी एक ट्रक रेल्वेद्वारे पुणे स्टेशन मार्गे केरळला रवाना झाला. या वेळी जिल्हाधिकारी काळम आणि निवासी जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. जिल्हा परिषद अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख, आमदार शिवाजीराव नाईक, आमदार सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी वि. ना. काळम, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित राऊत, महानगरपालिका आयुक्त रवींद्र खेबुडकर उपस्थित होते.

### गौण खनिज उपशावरून पदाधिकारी धारेवर

**बोरगाव, जि. सांगली :** गौण खनिज उपशावरून तुरची (ता. तासगाव) ग्रामसभेत तरुणांनी पदाधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. या ग्रामसभेत अखेर गावातील बेकायदा व्यवसाय मोडून काढण्याचा निर्णय घेण्यात आला. तुरची (ता. तासगाव) येथे ग्रामसभा पार पडली. सरपंच अनुपस्थित राहिल्याने उपसरपंच संदीप पाटील यांची ग्रामसभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. ग्रामसेवक एम. आर. जांबरे यांनी अहवालाचे वाचन केले. अभय कुमार शेठे यांनी ग्रामस्थांना अवैध धंदे कशाप्रकारे बंद करण्यात येतील याची माहिती दिली.

# कर्जमाफीतील अपात्र शेतकऱ्यांना कर्ज द्या

## सर्वोच्च न्यायालयाचे आदेश; जिल्ह्यातील ४४ हजार शेतकऱ्यांना नवीन कर्ज मिळणार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** केंद्र सरकारने २००९ मध्ये जाहीर केलेल्या कर्जमाफीसाठी अपात्र ठरलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. न्यायालयाने पाच लाखांपर्यंत थकीत असणाऱ्या अपात्र शेतकऱ्यांना नव्याने कर्जपुरवठा करण्याचे आदेश दिले, त्यामुळे जिल्ह्यातील ४४ हजार ६५९ शेतकऱ्यांना नवीन कर्ज मिळणार आहे.

जिल्ह्यातील २ लाख ८ हजार शेतकऱ्यांना २८० कोटींचे कर्ज माफ झाले होते. दरम्यान, यापैकी काही कर्ज चुकीच्या पद्धतीने वाटप केले आहे. असे ११२ कोटी कर्ज राष्ट्रीय

**नवीन कर्ज देण्याचे नाबार्डला आदेश**

**न्यायमूर्ती रंजन गोगई, न्यायमूर्ती नवीन सिन्हा व न्यायमूर्ती के. एम. जोसेफ यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. केंद्र सरकारला नोटीस लागू झाली नाही, या तांत्रिक मुद्द्यामुळे अंतिम सुनावणी होऊ शकली नाही; पण खंडपीठाने ५ लाखांपर्यंत अपात्र कर्जमाफी असलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा नवीन कर्ज देण्याचे आदेश नाबार्डला दिले आहेत.**

शेती आणि ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) कर्जमाफीसाठी अपात्र ठरवले. २ लाख ८ हजार शेतकऱ्यांना या योजनेसाठी पात्र धरले. याअंतर्गत एकूण २८० कोटींची कर्जमाफी होणार होती; मात्र मंजूर पीककर्ज, मर्यादेपेक्षा अधिक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेसाठी अपात्र ठरविल्याने ११२ कोटी परत गेले. याचा ४५ हजार शेतकऱ्यांना फटका बसला. जिल्ह्यातील ४८ हजार शेतकऱ्यांना फायदा झाल्याची प्रमाणपत्रे जिल्हा बँकेतर्फे होती. तरीही, ४४ हजार ६५९ शेतकऱ्यांना यातून अपात्र ठरविले होते. दरम्यान, केंद्र सरकारच्या कर्जमाफीसाठी अपात्र झालेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्यायालयाने दिलासा दिला. सहा वर्षांपासून जिल्हा बँकेने नाबार्डच्या विरोधात उच्च न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाने २००९ मध्ये कर्जमाफीच्या निकषांत कर्जमर्यादेचा उल्लेख नसल्याने संबंधित शेतकऱ्यांना अपात्र ठरविता येणार नसल्याचे आदेश दिले होते. २ मे २०१८ ला यावर सुनावणी झाली होती. यात न्यायालयाने १ लाखापर्यंत अपात्र शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याचे आदेश दिले.

# जलसंधारण घोटाळ्यातील कृषी विभागाचे तिघे निलंबित

**सांगली (प्रतिनिधी) :** महात्मा फुले भूमी व जलसंधारण योजनेतील कामे न करताच दहा लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याबद्दल कृषी आयुक्तांनी जत तालुक्यातील तीन कृषी अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. तत्कालीन कृषी अधिकारी बी. डी. लांडगे, मंडल कृषी अधिकारी एम. एन. खुडे आणि कृषी सहायक एस. एन. राठोड यांचा निलंबित केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे.

निगडी खुर्द (ता. जत) येथील कामात हा गैरव्यवहार झाला आहे. कृषी विभागातील गैरव्यवहार सामाजिक कार्यकर्ते विक्रम ढोणे यांनी उघडकीस आणला. त्यानंतर सांगलीत आंदोलन केले. आयुक्त कार्यालयापर्यंत आंदोलन केल्यामुळे आयुक्तांनी कारवाई केली आहे.

> या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला. यामुळे आयुक्तांनी अधिकाऱ्यांवर कारवाई केली.
> **– विक्रम ढोणे,** सामाजिक कार्यकर्ते, जत

जलसंधारणासाठी सन २०१६-१७ मध्ये भरघोस निधी मिळाला होता. हा निधी ग्रामपंचायतींची मागणी व जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार खर्च करावयाचा होता. ही कामे ग्रामपंचायतीने करावयाची होती. प्रत्यक्षात काम न करताच येथील बिल काढले आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी चौकशी, पाहणी करून आयुक्तांकडे अहवाल पाठवला होता. त्यानुसार आयुक्तांनी ही कारवाई केली.

# कोल्हापूर जिल्ह्यात ३१ सजांची निर्मिती

## निवासी उपजिल्हाधिकारी शिंदे यांची माहिती

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील जनतेची महसूल विभागाकडील व महसूलविषयक अन्य कामे प्राधान्याने मार्गी लागावीत, खातेदारांना विहित मुदतीत सर्व प्रकारचे दाखले मिळावेत यासाठी जिल्ह्यात ३१ सजांची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. या गावाना महसुली गावांचा दर्जा देण्यात आला असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी दिली.

श्री. शिंदे म्हणाले, की नव्याने निर्माण केलेल्या सजांपैकी १० गावांना यापूर्वीच महसुली गावाचा दर्जा देण्यात आला आहे. उर्वरित २१ पैकी २० गावांची प्रारूप अधिसूचना जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर तसेच संबंधित तहसीलदार कार्यालयाच्या नोटीसबोर्डावर व गाव कामगार तलाठी यांचे चावडी नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या अधिसूचनेमध्ये नव्याने घोषित महसुली गावामध्ये अंतर्भूत गट नंबर, सर्व्हे नंबर याबाबतची सविस्तर माहिती नमूद आहे.

महसुली गावे सज्जे असे- गडहिंग्लज- बड्याची वाडी/वडरगे, (ता. गडहिंग्लज), संभाजीपूर (ता. शिरोळ) कागल पूर्व, (ता. कागल) कलानगर, गावभाग, शिवाजीगर, आसरानगर, विवेकानंदनगर, पेठ भाग, जवाहरनगर, शिरोली चख, समर्थनगर, मौजे इचलकरंजी इंडस्ट्रियल इस्टेट शहापूर, (ता. हातकणगले) शाहू मिल परिसर, ताराबाई पार्क, क. बावडा पूर्व, उचगाव दक्षिण, वरुणतीर्थ, शेंडा पार्क व संभाजीनगर. (ता. करवीर).

सकाळ अ‍ॅग्रोवन
आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित
सकाळ अ‍ॅग्रोवन संवाद

**‘अ‍ॅग्रोवन’ साधणार शेतकऱ्यांशी संवाद**

**कार्यक्रम वेळापत्रक**

**शुक्रवार, ३१ ऑगस्ट २०१८ रोजी**

**विषय –** द्राक्ष व्यवस्थापन
**वक्ते – श्री. सुनील शिंदे** (द्राक्षतज्ज्ञ)
**स्थळ –**हनुमान मंदिर हॉल, बेडग, ता. मिरज, जि. सांगली
**वेळ –** सायं. ६ वा.

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**

# शिराळ पश्चिम भागात ओला दुष्काळ जाहीर करा

## हिरव्या चाऱ्याची मोठी टंचाई; नदीकाठावरील ऊस, भातपीक पाण्याखालीच कुजले

**कोकरूड, जि. सांगली (प्रतिनिधी) :** शिराळा तालुक्याच्या पश्चिम डोंगरी भागात सलग तीन महिने होत असलेल्या पावसाने व रोगाने खरिपातील पिके कुजू लागली आहेत. पिकावर व जमिनीवर शेवाळ मोठ्या प्रमाणात साचलेला दिसत आहे. जुलै व ऑगस्टमध्ये झालेल्या मुसळधार पावसाने या भागातील वारणा नदीला दोन वेळा पूर आला होता. अनेक गावांतील नदीकाठावरील ऊस व भातपीक आणि वैरणीची गवताची कुरणे कित्येक दिवस पाण्याखालीच कुजून गेली आहेत. त्यामुळे जनावरांना ओला चारा मिळेनासा झाला आहे. ओल्या दुष्काळामुळे हिरव्या चाऱ्याची मोठी टंचाई निर्माण झाली.

दूध व्यवसाय अनेक कुटुंबांसाठी उपजीविकेचे साधन बनले आहे. जनाउसाचा पाला, मका, गवत, गाजर गवत प्रामुख्याने जनावरांना ओला चारा म्हणून उपयोगात आणला जातो. वारणा नदीकाठी दोन वेळा पुराच्या पाण्यात नदीकाठची शेती पाण्याखाली गेल्याने ऊस व भातपिके, ओला चारा कुजून त्याचा वास येत आहे.



**शिराळा, जि. सांगली : पश्चिम भागात सतत सुरू असलेल्या पावसामुळे उसाचे असे नुकसान झाले आहे.**

> शिराळा पश्चिम भागात गेले अडीच महिने सुरू असलेल्या पावसाने खरिपातील पिके कुजू लागली आहेत. शासनाने ओला दुष्काळ जाहीर करताना कोणत्याही निकषात अडकवू नये.
> **– विकासराव देशमुख,** स्वाभिमानी शेतकरी संघटना